सायं.दैनिक
बीड **किसान**
www.beedkisan.in
• संपादक : शेख कामरान •
BEED KISAN

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ३४८ ▪ बुधवार, दि. २९ एप्रिल, २०२६ ▪ पोस्टल दिनांक ३० एप्रिल, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-5 ▪ Issue-348 ▪ Wednesday 29 April, 2026 ▪ Postal Date 30 April, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## महिला आरक्षण विधेयकाला विरोध करणाऱ्या काँग्रेसविरोधात माजलगावात निषेध आंदोलन

**माजलगाव । किसान न्युज**

दि. २९ लोकसभेत महिला आरक्षण विधेयकाला काँग्रेस पक्षाने विरोध केल्याच्या निषेधार्थ बीड जिल्ह्यातील माजलगाव तहसील कार्यालयासमोर शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांच्या वतीने शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांच्या नेतृत्वाखाली दि.२९ एप्रिल बुधवार रोजी दुपारी जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने आंदोलन करण्यात आले. आंदोलनाद्वारे काँग्रेस पक्षाच्या भूमिकेचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी लोकसभेत महिला आरक्षण विधेयकावर मतदान झाले होते. यावेळी काँग्रेस पक्षाने विधेयकाच्या » पान २ वर



# पोट निवडणुकीत संतोष देशमुखांच्या पत्नीचा पराभव

## जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या मस्साजोग ग्रामपंचायत निवडणुकीचा धक्कादायक निकाल

## ९ मतांनी पराभूत झालेले स्वरुपानंद देशमुख ९२ मतांनी केला विजय प्राप्त

**केज । किसान न्युज**

**तालुक्यातील मस्साजोग चे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे ग्रामपंचायतीच्या रिक्त झालेल्या सरपंचपदासाठी झालेल्या पोटनिवडणुकीचा आज बुधवारी (दि.२९) निकाल जाहीर झाला असून यात मोठा उलटफेर पाहायला मिळाला आहे. या चुरशीच्या लढतीत दिवंगत माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना पराभवाचा धक्का बसला असून, त्यांचे प्रतिस्पर्धी स्वरूपानंद देशमुख यांनी ९२ मतांनी विजय मिळवला आहे. माजी सरपंचांच्या हत्येनंतर रिक्त झालेल्या या जागेसाठी अत्यंत तणावपूर्ण वातावरणात मतदान पार पडले होते, ज्याचा निकाल आज केज तहसील कार्यालयातील मतमोजणीनंतर स्पष्ट झाला.**

आज सकाळी केज तहसील कार्यालयात मतमोजणी प्रक्रियेला सुरुवात झाली. एकूण तीन फेऱ्यांमध्ये ही मतमोजणी पार पडली. पहिल्या फेरीपासूनच स्वरूपानंद देशमुख यांनी आपली आघाडी कायम ठेवली होती. पहिल्या फेरीत त्यांनी १५६ मतांची, तर दुसऱ्या फेरीत २० मतांची आघाडी घेतली होती. अश्विनी देशमुख या सुरुवातीपासूनच पिछाडीवर राहिल्याने अखेर स्वरूपानंद देशमुख यांनी ९२ मतांच्या फरकाने विजय प्राप्त केला. या निकालानंतर स्वरूपानंद देशमुख यांच्या समर्थकांनी गुलाल उधळून आणि घोषणाबाजी करत मोठा जल्लोष साजरा केला. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची डिसेंबर २०२४ मध्ये अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली होती आणि हे सरपंचपद रिक्त झाले होते. पोटनिवडणुकीत दिवंगत संतोष देशमुखांच्या पत्नी अश्विनी देशमुख स्वतः रिंगणात उतरल्याने या लढतीला मोठी भावनिक किनार प्राप्त झाली होती. सहानुभूतीच्या जोरावर अश्विनी देशमुख विजय मिळवतील असा कयास लावला जात होता, मात्र मतदारांनी स्वरूपानंद देशमुख यांच्या बाजूने कौल दिल्याने राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावल्या आहेत. विजयानंतर » पान २ वर








### संतोष देशमुख यांनी केला होता ९ मतांनी पराभव

**संतोष देशमुख आणि स्वरुपानंद देशमुख या दोघांत लढत झाली होती. तेंव्हा संतोष देशमुख यांनी स्वरुपानंद देशमुख यांचा ९ मतांनी पराभव झाला होता. मात्र त्यांच्या पश्चात स्वरुपानंद देशमुख हे विजयी झाले आहेत. त्यावेळच्या पेक्षा या पोट निवडणुकीत १० टक्के मतदान जास्त झाले होते. यामुळे याचा फायदा कोणाला होणार अशी चर्चा सुरू होती. अखेर त्या मतांचा फायदा स्वरुपानंद देशमुख यांना झाल्याचे निकालानंतर दिसून येत आहे.**

## अज्ञात व्यक्तीचा अपघाती मृत्यू
### ओळख पटवण्याचे आवाहन

**बीड । किसान न्युज**

(दि. २९ एप्रिल २०२६) :- बीड येथील सरकारी रुग्णालयाने दिलेल्या माहितीनुसार, दि. २८ एप्रिल २०२६ रोजी एम.एल.सी. क्र. ५२४६ अंतर्गत एक अज्ञात इसम जखमी अवस्थेत दाखल करण्यात आला होता.





संबंधित इसमास सोलापूर-धुळे महामार्गावरील बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अज्ञात वाहनाने धडक दिल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सदर इसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून, त्याचे नाव व पत्ता अद्याप समजू शकलेला नाही. अपघातात गंभीर जखमी झालेल्या या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, त्याची ओळख पटवण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मृत व्यक्तीच्या अंगावर निळ्या रंगाची 'घळश्रश्र थळश्रश्र' कंपनीची नाईट पॅन्ट असून, पायात 'ऋळश्रशी' कंपनीची सँडल आहे. तसेच हातात पांढऱ्या धातूचे कडे असल्याचे वर्णन करण्यात आले आहे. तरी कोणाला संबंधित व्यक्तीबाबत माहिती असल्यास किंवा कोणी व्यक्ती हरवलेली असल्यास बीड ग्रामीण पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. संपर्कासाठी फोन क्रमांक ०२२४४२२, ०२२२४२२ तसेच चौकशी अंमलदार (मो. ९८२२३४२०८२) आणि प्रभारी अधिकारी (मो. ७७२२०३५२०९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, संबंधित मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## मुस्लिम आरक्षण कृती समितीच्या लढ्याला पहिल यश

**या यशाचं श्रेय एकीने लढणाऱ्या समाजाचं आहे : अरबाज पठाण**

## समितीच्या मागणीवर मार्टी सक्षम करण्याचे निर्देश

**बीड । किसान न्युज**

**मुस्लिम आरक्षण कृती समितीच्या वतीने दि. १७ रोजी बीड येथे काढण्यात आलेल्या भव्य मोर्चानंतर राज्य सरकारने समितीच्या प्रमुख मागण्यांची गांभीर्याने दखल घेतली आहे. समितीचे प्रमुख अरबाज पठाण यांच्या नेतृत्वाखाली मांडण्यात आलेल्या प्रश्नांवर सकारात्मक हालचाली सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे.**



या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. अल्पसंख्याक विकास विभागाच्या विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी आयोजित या बैठकीत शिक्षण, कौशल्य विकास आणि सामाजिक सक्षमीकरण या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. बैठकीत घेतलेले निर्णय सकारात्मक आणि परिणामकारक ठरणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. बैठकीदरम्यान राज्य सरकार अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही देण्यात आली. विशेषतः शिक्षण क्षेत्रात मोठे पाऊल उचलत मुंबईतील चेंबूर येथील अणुशक्तीनगर परिसरात अल्पसंख्याक मुलींसाठी प्रस्तावित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या उभारणीच्या कामाला गती देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. या उपक्रमामुळे अल्पसंख्याक मुलींना उच्च तांत्रिक शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध होणार आहेत. अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यावरही भर देण्यात आला. विशेषतः मुलींच्या शिक्षणासाठी दर्जेदार सुविधा निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. तसेच 'मार्टी' संस्थेशी संबंधित विविध मुद्द्यांवरही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. संस्थेसाठी स्वतंत्र लेखा उघडणे, मंजूर पदे तत्काळ भरणे तसेच तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्त्वावर कार्यालय सुरू करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले. याशिवाय अल्पसंख्याक तरुणांना आधुनिक शिक्षणाशी जोडण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा झाली. कौशल्य विकास, » पान २ वर

## मुस्लिमांच्या विकास योजनांवर सुनेत्राताई पवार कटिबद्ध

### मुलींचे वस्तीगृह व मार्टीसाठी ठाम भूमिका – शेख निजाम

**बीड । किसान न्युज**

अल्पसंख्याक विकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी आज आयोजित करण्यात आलेली बैठक सकारात्मक आणि परिणामकारक चर्चे सह यशस्वीरीत्या संपन्न झाली. यावेळी शिक्षण, कौशल्य विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यास राज्य सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाही देत, चेंबूर येथील अणुशक्तीनगर परिसरात व बीड येथील अल्पसंख्याक मुलींसाठीच्या प्रस्तावित मुलीचे वसतिगृह व जागा उपलब्ध करून कामाला गती देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले



मा.आमदार विजयसिंह पंडित, नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, शेख मुजीबभाई,फारुख पटेल, भागवत तावरे यांच्या सतत पाठपुरावा चालु आहे.. अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी राज्य सरकार विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत असून या प्रयत्नांना अधिक गती देण्यात येणार आहे. विशेषतः » पान २ वर

## राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा प्रभाव करत सिरसाळ्यात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचा झेंडा

### सिरसाळा सरपंचपदी शिवसेनेचे शेख नसीब यांचा दणदणीत विजय



**बीड (प्रतिनिधी)**

परळी तालुक्यातील सिरसाळा ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार शेख नसीब यांनी दणदणीत विजय मिळवत पक्षाचा झेंडा उंचावला आहे. मंगळवारी (दि. २९) जाहीर झालेल्या निकालात शेख नसीब यांनी ८५० मताधिक्याने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या उमेदवाराचा पराभव करत आपली ताकद सिद्ध केली. या विजयामुळे परळी तालुक्यात शिवसेनेची पकड अधिक मजबूत झाल्याचे चित्र दिसून येत आहे. या निवडणुकीत शिवसेनेच्या वतीने शेख नसीब आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे देवराव काळे व एमआयएमच्या उमेदवारात चुरशीची लढत झाली. यामध्ये शेख नसीब यांनी देवराव काळे यांचा ८५० मतांनी पराभव करुन विजय मिळविला. दरम्यान सिरसाळा ग्रामपंचायत पोटीनिवडणूक अतिशय प्रतिष्ठेची झाली होती प्रचारादरम्यान शिवसेनेच्या उमेदवारांनी मतदारांशी थेट संवाद साधत स्थानिक प्रश्नांवर भर दिला होता, ज्याचा स्पष्ट फायदा उमेदवाराला झाला. नुकत्याच झालेल्या परळी नगर पालिकेतही शिवसेनेचे दोन नगरसेवक » पान २ वर

## बार्शी रोडच्या रेल्वे पूला जवळ पथदिवे, सूचना फलक नसल्याने अपघात वाढले

**बीड । किसान न्युज**

बीड शहरातील बार्शी रोडवरील रेल्वे पूल सध्या अत्यंत धोकादायक अवस्थेत असून, नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या मार्गावर मोठ्या प्रमाणात आवक-जावक होत असताना, पुलाखाली व परिसरात एकही पथदिवा नसल्यामुळे अंधाराचे साम्राज्य पसरलेले दिसून येते. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पुलाजवळ कोणतेही सूचना फलक नसल्यामुळे वाहनचालकांना पुढील धोका लक्षात येत नाही. तसेच रेडियम (रिफ्लेक्टर) नसल्याने रात्री वाहनांच्या प्रकाशात रस्त्याची किंवा पुलाच्या कडांची स्पष्ट जाणीव होत नाही, ज्यामुळे अपघाताचा धोका अधिक वाढला आहे. नुकत्याच काही दिवसांपूर्वी रात्रीच्या वेळी येथे एक अपघात घडला होता. सुदैवाने त्यात कोणतीही » पान २ वर



## साई मोबाईल शॉपी चोरीचा एलसीबीने दहा दिवसात लावला छडा

### अट्टल गुन्हेगार रामनिवास गुप्ताच्या मुसक्या आवळल्या; अनेक गुन्हे उघडकीस येणार



**बीड । किसान न्युज**

शहरातील सुभाष रोडवरील साई मोबाईल शॉपी फोडून अज्ञात चोरट्यांनी लाखोंचे मोबाईल लंपास केले होते. या घटनेचा महाराष्ट्र सह गोवा, गुजरात राज्यात शोध घेत होते. अखेर आरोपी अट्टल गुन्हेगार रामनिवास मंजू गुप्ता याच्या दिवा ठाणे येथे मुसक्या आवळल्या आहेत. या गुन्हेगाराने बीड,पुणे, नगर येथे चोऱ्या केल्याची कबुली दिली आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शहरातील गजबजलेला भाग म्हणून ओळखले जाणाऱ्या सुभाष रोडवरील साई मोबाईल शॉपीचे शटर तोडून अज्ञात चोरटे आत घुसले आणि आतील लाखोंच्या किमतीचे मोबाईल चोरुन नेल्याची घटना दि. १९ एप्रिल रोजी घडली होती. याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सीसीटीव्ही फुटेज व इतर आधार घेऊन या चोरीच्या घटनेचा तपास सुरू केला होता. गुप्त खबऱ्याकडून ही चोरी आंतरराज्य टोळीचा रामनिवास गुप्ता यांने आणि त्याच्या टोळीने केल्याची माहिती मिळाली होती. याप्रकरणी पोलीस अधीक्षक यांनी एलसीबीचे पथक याच्या मागावर पाठवले होते. या एलसीबी पथकाने मुंबई, ठाणे, कल्याण, गोवा,गुजरात येथे शोध घेतला आहे. पण तो काही मिळून आला नाही. दरम्यान रामनिवास गुप्ता हा दिवा पूर्व ठाणे येथे असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे एलसीबी पथकाने सापळा रचून त्यास शिताफीने ताब्यात घेतले. त्यांने बीड येथे चोरी केल्याची कबुली दिली. तसेच तो माल एका तिराईत इसमाकडे » पान २ वर

